**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)**
**शनिवार दिनांक १२ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **भारताचे ब्रिक्स अध्यक्षपद लोककेंद्रित, मानवतावादी दृष्टिकोनावर आधारित असल्याच पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन ; १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सदस्य देशांनी स्वीकारला दिल्ली जाहीरनामा**

2. **मराठा आरक्षण आंदोलन गणेशोत्सवादरम्यान करु नये असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच मनोज जरांगेंना आवाहन; तर १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्याची जरांगेंची घोषणा**

3. **महिला क्रिकेट टी ट्वेंटी आशिया चषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि श्रीलंका यांच्यात उद्या रात्री लढत**

4. **यवतमाळ, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट, नागपुरात देखील पावसाची दमदार हजेरी**

**आता सविस्तर बातम्या**

**ब्रिक्स परिषद**

नवी दिल्लीत भारताच्या अध्यक्षतेखाली अठराव्या ब्रिक्स शिखर परिषदेचं आयोजन भारत मंडपम इथं सुरू आहे. परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, गेल्या २० वर्षांत ब्रिक्सनं जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, सध्याची परिषद हा ऐतिहासिक टप्पा असल्याचं सांगितलं.भारताच्या अध्यक्षतेची संकल्पना लोककेंद्रित आणि मानवतेला प्राधान्य देणारी असल्याचं नमूद करुन लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार बाबींना भारतानं प्राधान्य दिलं आहे. या अनुषंगानं देशभरात ३० शहरांमध्ये ३५० हून अधिक बैठका घेण्यात आल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

ब्रिक्स कोणाच्याही विरोधात नसून, अधिक प्रतिनिधित्व करणारी आणि सर्वसमावेशक जागतिक शासनव्यवस्था आवश्यक असल्याचं पंतप्रधानांनी स्पष्ट केलं. जागतिक शासनव्यवस्थेसाठी त्यांनी १० कलमी कृती आराखडा मांडला. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्यास आता विलंब करता येणार नाही, यासंदर्भातील वाटाघाटींना निश्चित कालमर्यादा आणि स्पष्ट परिणामांची जोड देणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. तसच, ग्लोबल साऊथनं जागतिक नियम निश्चित करण्यात

अधिक सक्रिय भूमिका बजावावी, असं आवाहन त्यांनी केलं.या अत्यंत महत्त्वाच्या शिखर परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान हे नेते सहभागी झाले असून त्यांच औपचारिक स्वागत पंतप्रधान मोदी यांनी भारत मंडपम येथे केले . दरम्यान आजच्या ब्रिक्स समारोपीय सत्रामध्ये तसेच ब्रिक्स शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी सदस्य देशांनी नवी दिल्ली जाहीरनामा एकमतानं स्वीकारला. या जाहीरनाम्यात सदस्य देशांचा सामूहिक संकल्प स्पष्ट झाला असून, त्यातील निर्णयांची ठोस अंमलबजावणी करण्याची सामायिक जबाबदारी सर्व देशांची असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

दरम्यान ब्रिक्सच्या २०व्या वर्धापनदिनानिमित्त २ स्मरणार्थ टपाल तिकिटांचंही सदस्य नेत्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं. यापुढील १९ वी ब्रिक्स शिखर परिषदे चीन मध्ये आयोजित होणार आहे.

**विमान सेवा**

भारत आणि चीन यांच्यात कोविड महामारीमुळे स्थगित झालेली विमानसेवा येत्या २१ सप्टेंबर पासून पुन्हा सुरु होणार आहे. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर चीनच्या सदर्न एअरलाईन्स या विमान कंपनीनं आज ही घोषणा केली. भारतीय विमान कंपनी इंडिगोनं या वर्षी मार्चमध्ये, शांघाय आणि कोलकाता दरम्यान दैनंदिन विमानसेवा सुरू केली असून चीनच्या बाजूनं देखील आता ग्वांगझू आणि नवी दिल्ली दरम्यान नियमित प्रवासी विमानसेवा सुरु होत आहे.

**महसूलमंत्री बावनकुळे**

मुंबईसह राज्यातला गणेशोत्सव हा देशातला सर्वांत मोठा उत्सव असून, या काळात आंदोलन करून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू नका, असं आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते आज नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

आजवर मराठा समाजाला जो न्याय मिळाला, त्यातले महत्त्वाचे निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झाले आहेत. राज्यसरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या दिशेनं काम करत आहे, असं ते म्हणाले.तर जालना जिल्ह्यातल्या अंतरवाली सराटी इथं आज मराठा बांधवांसोबत झालेल्या बैठकीनंतर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांवरून पुन्हा आक्रमक भूमिका घेतली असून १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. गणपतीची स्थापना करून १५ सप्टेंबरला मुंबईकडे निघा आणि मराठा समाजातल्या मुलांच्या भविष्यासाठी या आंदोलनात सहभागी व्हा, असं आवाहन जरांगे यांनी यावेळी समाजबांधवांना केलं १५ सप्टेंबरपासून मुंबईकडे पदयात्रा

काढण्यात येणार आहे. आंदोलकांचा मुक्काम पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर आणि खोपोली इथं राहणार असून, १९ सप्टेंबरला सकाळी १० वाजता आझाद मैदानावर उपोषण सुरू होईल. आंदोलन शांततेच्या आणि लोकशाही मार्गानं करण्याचं आवाहन जरांगे यांनी केलं आहे.

**दुष्काळ परिस्थिती आढावा**

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शेतकऱ्यांना दुष्काळाच्या काळात कशी मदत करता येईल, याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून शासनाच्या नियमावलीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याची सरकारची भूमिका आहे राज्यातील सुमारे १८ जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे. अनेक ठिकाणी पिके करपत आहेत. याबाबत काल सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून, बावनकुळे आज दुपारी नागपूरच्या नियोजन भवन येथे राज्यातील दुष्काळ प्रभावित जिल्ह्यांचा दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे आढावा घेत आहेत.

**टी-२० आशिया चषक**

महिला क्रिकेटमध्ये, दुबई इथं उद्या होणाऱ्या टी-२० आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार उद्या १३ सप्टेंबर रविवारी रात्री ८ वाजता हा सामना सुरू होइल. श्रीलंकेनं काल उपान्त्य सामन्यात पाकिस्तानचा चार गडी राखून पराभव करुन अंतिम फेरीत धडक मारली. सात वेळा विजेतेपद पटकावणारा भारतीय संघ साखळी फेरीत अव्वल स्थानावर आहे तर २०२४ मध्ये श्रीलंकेनं भारताचा पराभव करून आपलं पहिलं आशिया चषक विजेतेपद पटकावलं होतं.

**हवामान**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार आज यवतमाळ, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलाय. नागपुरत आज सकाळपासून अधून मधून मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असून दुपारी चार नंतर जोरदार पावसाने हजेरी लावली. आगामी काही तासांमध्ये नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

**आदासा गणेश मंदिर**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील ऐतिहासिक आदासा गणेश मंदिराला ‘ब’ वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागानं घेतला आहे. पुण्यश्लोक

अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत हा दर्जा देण्यात आला आहे.या निर्णयामुळे आदासा परिसरातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असून, भाविकांसाठी विविध पायाभूत सुविधा विकसित करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाचं स्वागत करत गणेशोत्सवाला प्रारंभ होत असून अशा मंगलमय वातावरणात आदासा गणेश मंदिराला 'ब' वर्ग दर्जा मिळणे ही गणेशभक्तांसाठी निश्चितच आनंदाची आणि अभिमानाची बाब असलयाच म्हटल आहे.

**जनसंपर्क कार्यक्रम**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या, रविवार, १३ सप्टेंबर रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे होणार आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मंत्री नागरिकांची निवेदने स्वीकारून त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी समस्या, मागण्या लेखी निवेदनासह आवश्यक कागदपत्रे जोडून आणावीत. दुपारी १ ते २ या वेळेत ते भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटणार आहेत.

*****